# सेवक वार्ता

ऑगस्ट-२०२३

वर्ष -४, अंक-१०

कार्यालय - वन ग्रंथालय, दुसरा मजला, वनभवन, भांबुर्डा वन विहार, गोखले नगर, पुणे - १६

## सेवक संघ धुळे शाखेची वार्षिक सर्व साधारण सभा संपन्न

सेवक संघ धुळे शाखेच्या सन २०२२-२३ साठीची वार्षिक सर्व साधारण सभा दि. १३-८-२०२३ रोजी, रविवारी सकाळी १० ते १४वाजेच्या दरम्यान ज्येष्ठ नागरिक सेवा संघ, सैनिक लॉन्स शेजारी, संतोषी माता चौक, साक्री रोड, धुळे संपन्न झाली व खालील कार्यक्रम पत्रिकेनुसार कामकाज झाले.

(१) मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे

(२) धुळे शाखेने सन २०२२-२३ या वर्षात केलेल्या कामाचा आढावा घेणे .

(३) धुळे शाखेचे सन २०२२-२३ चा सेवक संघाचे सनदी लेखापाल यांचे अंकेक्षणास अधिन राहून सचिव सेवक संघ, धुळे शाखा, धुळे यांनी तयार केलेला / वार्षिक जमा-खर्च मांडणे

(४) धुळे शाखेचे सदस्य नोंदणीचा आढावा घेणे

(५) धुळे शाखेचे सन २०२२-२३ साठी वार्षिक कार्यक्रम, धोरण व अंदाज पत्रक ठरविणे

(६) उत्कृष्ठ कामाबद्दल वन कर्मचारी व सेवक सदस्य यांचा सत्कार

(७) आयत्या वेळचे विषय

सेवक संघ महाराष्ट्र धुळे शाखेतर्फे वन विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा त्यांनी केलेला उत्कृष्ट व अतिविशिष्ट कामाबाबत त्यांचा दरवर्षी वार्षिक सर्वसाधारण सभेत शाल, श्रीफळ व सन्मानपत्र देऊन त्यांचा सन्मान केला जातो.

सेवक संघातर्फे फेब्रुवारी -२३ मध्ये करण्यात आलेल्या विविध कामांच्या मुल्यांकन चमूच्या शिफारशीनुसार यावर्षीही दि. १३ ऑगस्ट २०२३ रोजी आठ अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. प्रमूख पाहुणे म्हणून श्री. राजवर्धनजी कदमबांडे, माजी आमदार, धुळे हे लाभले होते. त्यांचे श्री. गवळी यांचे हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्याल आले. या वार्षिक सभेत श्री.राजवर्धनजी कदमबांडे यांचे हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

(१) श्रीमती अर्चना मनोहरराव चंद्रमोरे, वनपाल, सा. व. विभाग, जालना

(२) श्री. नगराज धर्मा चौधरी, वन रक्षक, नांदगाव, सा. व. विभाग, नाशिक

(३) श्री. चंद्रकांत काशिनाथ गाडे, वनपाल, राहुरी, सा. व. विभाग, अ'नगर. श्री. या कार्यक्रमास सहकुटुंब आले होते

(४) श्रीमती शुभांगी विशाल धोटे, वनक्षेत्रपाल, राहुरी सा. व. विभाग, अ'नगर यांचे वतीने श्री. गाडे

(५) श्री. प्रेम नरेंद्र तिडके, वनक्षेत्रपाल, सा. व. विभाग, वाशिम, यांचे वतीने श्रीमती राठोड

(६) श्री. सुदर्शन शेषराव पोले, वनपाल, , परभणी यांचे वतीने श्रीमती राठोड

(७) श्री. प्रविण किसन विशे, वन रक्षक, शहापूर.अनुपस्थित

(८) श्री. जयवंत मधुकर खेकाने, वनरक्षक, शहापूर, अनुपस्थित

श्री. चंद्रकांत काशिनाथ गाडे, राहुरी, या कार्यक्रमास सहकुटुंब आले होते.

वार्षिक सर्वसाधारण सभेस जळगाव, चाळीसगाव येथून मोठया संख्येने सदस्य उपस्थित होते.

श्री.पाटील यांनी सत्कार कार्यक्रमाचे कुशलपणे सुत्रसंचालन केले. श्री. व्ही. पी. पवार, सदस्य, यांनी आभार मानले.



*स्वातंत्र्यदिन चिरायू होवो*

















सभेदरम्यान श्री. बी. आर. छल्लारे, सह-कोषाध्यक्ष यांचे छोटेखानी किर्तन झाले.



धुळे शाखेतर्फे श्री. वसंत जोशी सरांनी सेवक संघाचे प्रति दिलेल्या सेवेबद्दल व संत साहित्याचे इंग्रजीत भाषांतराचे कामाबद्दल एक सन्मानपत्र देऊन सन्मानित केले. सदर कार्यक्रमास ते प्रकृती स्वास्थ्यामुळे उपस्थित राहू शकले नाहीत.

या सत्कारास त्यांनी खालील उत्तर देऊन त्यांच्या भावना व्यक्त केल्या.

" गवलीजी आपण माझे बद्दल व्यक्त केलेल्या भावना बद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. मला सेवक संघाकडून यापूर्वी सन २०२२ मधे सन्मानीत करण्यात आले होते, तरी धुळे शाखे कडून मिळालेला सन्मान मी आनंदाने स्वीकार करत आहे. मी धुळे जिल्ह्यात यापूर्वी काम केलेले असल्याने मला धुळे शाखेचा रास्त अभिमान आहे. "


सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र
धुळे शाखा, धुळे
सन्मान पत्र
सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ महाराष्ट्र,
धुळे शाखा, धुळे

## जयप्रकाश पाटील, सचिव यांचे बिजारोपन व वनांचे संवर्धनाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन








इंग्लिश स्कूल, लामकांनी, ता.जि. धुळे तर्फे लामकांनी येथील गोवर्धन डोंगरावर बिजारोपन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यास श्री नितीन कुमार सिंग उप वन संरक्षक, धुळे, श्री. जयप्रकाश पाटील, सचिव, सेवक संघ, ग्रामस्थ लामकांनी, वनपाल, लामकांनी, वन कर्मचारी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांनी गोवर्धन डोंगरावर बिजरोपण केले. जयप्रकाश पाटील उपस्थितांना बिजारोपन व वनांचे संवर्धन बाबत मार्गदर्शन केले

## जुन्या आठवणी ......

- वि. त्र्यं. पत्की

१९८९ सालात शहापूर वन विभागाचे धसई वनक्षेत्रात एक रानगवा आला होता. गावक-यांनी त्याला पकडून मोठ्या दोराने मोहाच्या झाडास बांधून ठेवले होते.त्यास मुंबईच्या जिजामाता उद्यानात हलविण्यासाठी श्री.एम.एस. नाईक, ACF, WL, Thane यांनी व्यवस्था केली.महानगर पालीकेच्या व्यवस्थापकांनी गव्याची तपासणी करून त्याला प्राणी संग्रीलयामध्ये नेण्याचे ठरविले.गवा वृध्द व एका डोळ्याने आंधळा होता. शहापूर विभागाचे कार्यालयासमोर वाहतुक करणारे वाहन सुमारे तीन तास होते. त्या वेळेत अंदाजे २००० नागरीकांनी गव्याचे यमदूत समजून पूजन करून दर्शन घेतले. महिलांची संख्या जास्त होती. वाहतुक परवाना घेऊन वाहन मुंबईस रवाना झाले. दुर्देवाने १५ दिवसानंतर गव्याचे निधन झाले.

तत्कालीन मुख्य वन्यजीव संरक्षक (श्री.रा.ल.चौधरी साहेब) यांनी मला फोनवर फक्त एक प्रश्न विचारला " रानगव्याला पकडण्याचे आदेश कुणी दिले होते?", "कुणीच नाही " असे उत्तर ऐकून ते फक्त हंसले आणि प्रकरण बंद झाले. अनुसूची-१ मधील वन्यजीव गवा असल्याने हा प्रश्न त्यांनी विचारला होता.

### सप्टेंबर - २३ चा सेवक वार्ताचा अंक हा "जुन्या आठवणी विशेषांक"

आपल्या प्रदीर्घ वनसेवेमध्ये प्रत्येकाला कधी ना कधी कडू-गोड, तर कधी खूप छान अनुभव आलेले असतात व ते आपल्या मनात कायम आठवणी म्हणून ठसून जातात. यातील काही आठवणी अत्यंत हृदयस्पर्शी, मनोहर असतात. त्या आपण इतरांशी वाटल्या तर इतरांनाही त्याचा आनंद उपभोगता येईल. सबब आपणास आवाहन करण्यात येते की माहे सप्टेंबरच्या अंकासाठी आपल्या आठवणी पाठवाव्यात. त्यांना संघ मंचावर उचित स्थान व प्रसिद्धी देणे उचित असल्याने माहे सप्टेंबर -२३ चा सेवक वार्ताचा अंक हा " **जुन्या आठवणी विशेषांक** " म्हणून प्रकाशित करण्यात येईल. तरी सेवक संघाच्या सदस्यांनी आपल्या **जुन्या आठवणी** मला DVBW-TT Yogesh किंवा UNICODE- NIRMALA UI फॉन्टमध्ये पाठवाव्यात, असे आवाहन करण्यात येत आहे. **जुन्या आठवणी** मराठीत व यापुर्वी अप्रकाशित असावी. शब्द मर्यादा - जास्तीत जास्त दोनशे .

## "जीवन साथी"या श्री रामदास पुजारी लिखित कवितेस रु १०००/- चा प्रथम पुरस्कार

कविता स्पर्धेचे परीक्षक श्री. एम. एम कुलकर्णी , कार्यकारी अध्यक्ष, सेवक संघ,यांनी निवड केल्यानुसार

"जीवन साथी"या श्री रामदास पुजारी लिखित कवितेसाठी रु १०००/- रकमेचा प्रथम पुरस्कार घोषित झाला आहे. श्री पुजारी यांना उत्कृष्ट प्रवेशिकेबद्दल सन्मानपत्र सर्व - साधारण वार्षिक सभेत दिनांक 13 ऑगस्ट रोजी प्रदान करण्यात आला. त्यांचे हार्दिक अभिनंदन.


सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र

धुळे शाखा, धुळे

सन्मान पत्र

श्री. रामदास गवराम पुजारी, सदस्य, सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ (सेवक) महाराष्ट्र, पुणे.

आपण सेवानिवृत्त वन कर्मचारी संघाचे (सेवक) महाराष्ट्रचे मुखपत्र 'सेवक वार्ता' द्वारा माहे जुलै-२०२३ मध्ये आयोजित कवितास्पर्धेत सहभागी झाले होते. कवितेच्या अनेक प्रवेशिकांतून आपल्या 'जीवनसाथी' कवितेस परीक्षकांनी उत्कृष्ठ कविता म्हणून प्रथम पुरस्कारासाठी निवड केली आहे. कवितेतून आपण निसर्ग व वृक्षांप्रती संवर्धनाचा संदेश देऊन आपण हे प्रभावी योगदान दिले आहे.

त्याप्रित्यर्थ, आपणास, सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ (सेवक) महाराष्ट्र, धुळे शाखेतर्फे वार्षिक सभा २०२३ प्रसंगी हे सन्मान पत्र देवून गौरविण्यात येत आहे.

धुळे
दिनांक- १३ ऑगस्ट २०२३

(जे. ए. पाटील) सचिव

(एस. के. गवळी) अध्यक्ष

सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्र,
धुळे शाखा, धुळे

## जीवनसाथी

### कवि रामदास पुजारी

तूच माझा जीवनसाथी
तूच माझा सखा सोबती...
हल्ली मला सारखा प्रश्न पडतो...
खरंच, माझ्या सर्वात जवळचं
कोण..?
ज्यांनी हे सुंदर जग दाखवलं,
आपले सारे लाड, हट्ट पुरविले
ते आई-वडील ..?
ज्यांनी आपल्याला
संस्काररूपी ज्ञानदृष्टी दिली,
ते गुरुजन..?
आपल्यावर जीवापाड प्रेम करणारी,
आपली सदैव काळजी वाहणारी
बायको व मुलं ?
की...
ज्यांनी आपलं जीवन
आनंददायी, सहजसुंदर बनवलं
ते बालपणापासूनचे सवंगडी,
आजवरचे सहकारी..?
पण यापैकी कुणीच नाही
माझ्या प्रश्नाचं उत्तर...
मन:शांती, आत्मानंदाच्या शोधात
भटकत होतो वणवण जेव्हा
मी आणि माझं मन !
सापडलास तेव्हा तू ..
माझा खरा जीवनसाथी...
भूत-भविष्याचा सोडून विचार
रहावं वाटतं सदा
तुझ्या संगतीत, तुझ्याच विचारांत..
"सावलीसारखं सदा सोबत... "
असं म्हटल्यावर,
आठवायचं एखाद्याचं त्याच्या
सावलीसोबत असणारं
घट्ट सोबतीचं नातं...
पण खरं सांगू..?
त्यापेक्षा कितीतरी अधिक जवळचं
आहे तुझं - माझं नातं...!
आईच्या गर्भात वाढत असताना
आईच पाठवायची तुला माझ्याकडे...
तिथूनच सुरू झालं...
तुझं - माझं स्वतंत्र सहजीवन,
आदिपासून आहेस माझा सोबती
अंतापर्यंत असणार आहेस
माझा सोबती...
कारण तूच आहेस माझा
खरा जीवनसाथी
श्वास माझा तू...
तुझं - माझं जसं
तसंच तुझं आणि ऑक्सिजनचंही
घट्ट अनोखं नातं..
एकमेकांच्या साथीनं आजवर जगलो
आपण आरोग्यसंपन्न जीवन ...
पण माझ्या प्रिय मित्रा,
तुझ्याकडे पाहून हल्ली
सारखं वाटतं मला,
" श्वासाचाही गुदमरतोयं
की काय श्वास...? "
व्हेंटिलेटर, ऑक्सिजन सिलिंडर
हे शब्द आजकाल
सतत ऐकल्यावर वाटतं...
श्वासाची आणि त्याच्या
प्रिय ऑक्सिजनची होतेयं का
आज ताटातूट ?
आजवर होता मुबलक
निसर्गात ऑक्सिजन आणि
होता सुरक्षित प्रत्येक श्वास...
माझ्या प्रिय श्वासा,
जमलं तर भेटेन म्हणतोय,
विचारीन म्हणतोय
त्या सर्वशक्तिमान विधात्याला...
" चुकलीत का रे तुझी लेकरं ?
कर ना त्यांना एकदा माफ...."
सांगेन त्याला..
"माहित झालंय तुझ्या लेकरांना,
प्रत्येक झाड म्हणजे
कारखाना ऑक्सिजन निर्मितीचा .."
लावतील सारी भरपूर झाडं
विहरेल पूर्वीसारखाच
ऑक्सिजन चहूकडे..
आणि...
प्रत्येक श्वास होईल
पूर्वीसारखाच समृध्द..
मी..
माझा श्वास..
आणि माझ्या श्वासामधला ऑक्सिजन..
खराखुरा प्राणवायू...
आमचं हे सहजीवन
असंच चालू राहील अखंड..
कारण माझा श्वासचं आहे
माझा खरा जीवनसाथी...!

## नवीन आजीवन सदस्य

श्रीमती लताबाई पाटील, वनमजूर चाळीसगाव या रु २००० सदस्य शुल्क व प्रवेश शुल्क रु. १० भरून धुळे शाखेत आजीवन सदस्य झाल्या. त्यांचे हार्दिक स्वागत.

## आरोग्याविषयी टिप्स ...

### निष्काळजीपणामुळे होणारे आजार

१) पोट :- केव्हा बिघाडते, जेव्हा तुम्ही सकाळी नाष्टा करत नाही.......
२) मूत्रपिंड :- केव्हा बिघडतात जेव्हा तुम्ही २४ तासात १० ग्लास पाणी पीत नाही......
३) पित्ताशय :- केव्हा बिघडते, जेव्हा तुम्ही ११ च्या आत झोपत नाही व सूर्योदया पूर्वी उठत नाही........
४) लहान आतडे :- केव्हा बिघडते, जेव्हा तुम्ही थंड आणि शिळे अन्न खाता.......
५) मोठे आतडे :- केव्हा बिघडते,जेव्हा तुम्ही तळलेले आणि मसालेदार पदार्थ जास्त खाता.......
६) फुफ्फुसे :- केव्हा बिघडतात, जेव्हा तुम्ही धूर,धूळ आणि सिगारेट बिडी ने प्रदूषित वातावरणात श्वास घेता........
७) यकृत :- केव्हा बिघडते, जेव्हा तुम्ही तळलेले, जंक आणि फास्ट फूड खाता......
८) हृदय :- केव्हा बिघडते, जेव्हा तुम्ही जास्त मीठ मिश्रित व चरबीयुक्त तसेच रिफाइंड तेल अशा प्रकारचा आहार घेता.......
९) स्वादुपिंड :- केव्हा बिघडते, जेव्हा तुम्ही सहज मिळतात आणि चविष्ट लागतात म्हणून जास्त गोड पदार्थ खाता......
१०) "डोळे" :- केव्हा बिघडतात, जेव्हा तुम्ही अंधारात मोबाईल व कॉम्प्युटर वर काम करता......
११) "मेंदू" :- केव्हा बिघडतो, जेव्हा तुम्ही नकारात्मक विचार करता.......
*निसर्गाने "माफत" मध्ये दिलेल्या शरीराच्या अवयवाची योग्य काळजी घ्या योग प्राणायाम करा शरीर स्वस्थ तरच आपण मस्त शरीराचे

कोणते ही"अवयव" हे बाजारा मध्ये मिळत नाहीत आणि चुकून मिळाले तरी खूप महाग आणि आपल्या शरीरात योग्य पद्धतीने सुट होऊन बसतीलच असे नाही म्हणून आपल्या शरीरातील अवयवांची नेहमी काळजी घ्या..

तुम्हीच आहात तुमच्या शरिराचे खरे राखणदार......

*☆~☆~*☆~☆~*☆~☆~

## निधन वार्ता



**प्रसिद्ध निसर्ग कवी, साहित्यिक ना.धो.महानोर यांचे ३ ऑगस्ट २०२३ रोजी वयाच्या ८१ व्या वर्षी दुर्दैवी निधन झाले, ह्या नभाने ह्या भुईला, मी कात टाकली या कविता विसरणे शक्य नाही, ग्रामीण जीवन शब्दबद्ध करणारा, गावगाड्यातील गोष्टी सोप्या शब्दात मांडणारा संवेदशील कवि होते. नामदेव धोंडो महानोर हे ना.धों. महानोर यांचं संपूर्ण नाव. ते मूळचे छत्रपती संभाजीनगरमधील. कन्नड तालुक्यातील पळसखेडा येथले. ना.धों. महानोर यांना साहित्य विश्वाने त्यांना रानकवी ही उपाधी दिली. महानोर यांची अजिंठा लेण्यांजवळ वाकोद गावी सीताफळाची फार मोठी शेती आहे. या शेतीमध्ये त्यांनी विविध प्रकारची सीताफळ प्रजाती लागवड करून मोठ्या प्रमाणात उत्पन्न काढत. ड्रायलँड फार्मिंग व सेंद्रिय शेतीचे ते एक उत्तम उदाहरण आहे. त्यांच्या शेतातील सीताफळांना गुजरात राज्यातून प्रचंड मागणी होती. तेथील शेतात अनेक ठिकाणी प्रेरक व निसर्ग भावक सुविचार, सुभाषिते, कविता लिहलेले फलक होते. या शेतात अनेक नामवंतांनी भेटी दिल्या आहेत. एका सिताफळ वाणाला त्यांनी गानसम्राज्ञी लता मंगेशकर यांच्या शेतास दिलेल्या भेटी प्रित्यर्थ त्यांनी "लताफळ " असे नाव दिले आहे. ते ठिकाण शैक्षणिक स्त्रोत असल्याने तेथे मी संचालक पदी, वन प्रशिक्षण संस्था , पाल येथे कार्यरत असताना वनरक्षक प्रशिक्षणार्थींचे तेथे अभ्यास दौरे आयोजित केले होते.**

**धुळे वनविभागातील पश्चिम घाट वनक्षेत्राचे लिपिक श्री. नारायण सोनार यांचे दिनांक 2 ऑगस्ट 2023 रोजी हृदयविकाराने दुःखद निधन झाले. त्यांचा अंत्यविधी पिंपळनेर येथे पार पडला. त्यांना सेवक संघ सदस्यांतर्फे भावपूर्ण श्रद्धांजली. ईश्वर त्यांचे आत्म्यास सदगती देवो.**

*☆~☆~*☆~☆~*☆~☆~

## * कांदळवन (Mangroves)

- लेखक- श्री. प्रदिप कुलकर्णी



२००४ साली इंडोनेशिया,सुमात्रा येथे आलेल्या महाभयंकर त्सुनामीने संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले. हजारो मनुष्य प्राण्याचे जीव गेल्यानंतर कांदळवन परिसंस्थेचे **(Mangrove Eco-System)** महत्व जगाला कळून चुकल्यानंतरच त्याचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्न सुरू करण्यात आले. त्याच सुमारास भारताच्याही दक्षिण किनारपट्टीवर आलेल्या त्सुनामीने जीवित व मालमत्तेचे मोठे नुकसान झाल्यानंतर देशात ह्या परिसंस्थेच्या संवर्धनासाठी मोठ्या प्रमाणावर उपाययोजना सुरू करण्यात आल्यात.

महाराष्ट्र राज्याला लाभलेल्या ७२० किमीच्या समृद्ध किनारपट्टी पैकी केवळ २०० किमीचे क्षेत्र कांदळवनांनी व्यापले आहे.२०२१साली महाराष्ट्र राज्याने कांदळवनास कायदेशीर वनाच्या व्याख्येत समाविष्ट केले आहे.

कांदळवन/खारफूटी परिसंस्था- ह्या महत्वाच्या परिसंस्थेने (Eco system) जगात ०.४७ कोटी चौ.किमीचे क्षेत्र व्यापलेले आहे. ही एक महत्वाची परिसंस्था असून उष्ण कटीबंधातील तटवर्तीय जीवसंहतीचा (Coastal-Biome) हा एक अविभाज्य भाग आहे. जगात सुमारे ३० देशात खारफुटीचे वास्तव्य आढळून येते.

कांदळवने समुद्री लाटा व वादळांपासून होणारी जमिनीची धूप थांबविण्यासाठी संरक्षित आच्छादन म्हणून कार्य करते. ही वने विविध जलचर प्राण्यांचा अधिवासही असून ७७ प्रजातींचे मासे,विविध कोळंबी (Prawns),खेकडे,ऑयस्टर्स (Oysters) यात आढळून येतात.खारफूटीचे वनात उपलब्ध डेट्रीटस (झिजलेल्या दगड-रेतीचा चुरा-fine organic particulate matter) यावर त्यांचे उत्तरजीवित्व अवलंबून असते. या वनस्पतीचे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे खारट पाणी सहन करण्याची क्षमता.(Tolerance of saline-water) भारतात खारफुटीच्या जवळपास ६० प्रजाती असून त्यातील ३३ प्रजाती पश्चिम किनारपट्टीवर आढळून येतात.

खारफूटीचे उपयोग

- खारफुटीचा उष्मांक उच्च असल्यामुळे लाकूड,जळाऊ सरपण व कोळसा उत्पादनासाठी मोठ्या प्रमाणावर वापरतात.
- कातडी कमविण्याचे उद्योगात टॅनिनचा प्रमुख स्त्रोत म्हणून खारफुटीचा वापर केला जातो.पश्चिम बंगाल व ओरीसा मध्ये मध उत्पादन करण्यासाठी खारफुटी क्षेत्राचा वापर केला जातो.
- खारफूटी तटवर्तीय वने असल्यामुळे तटवर्तीय क्षेत्राची धूप थांबविण्यासाठी अत्यंत उपयोगी

महाराष्ट्र राज्याला लाभलेल्या ७२० किमीच्या समृद्ध किनारपट्टी पैकी केवळ २०० किमीचे क्षेत्र कांदळवनांनी व्यापले आहे.२०२१साली महाराष्ट्र राज्याने कांदळवनास कायदेशीर वनाच्या व्याख्येत समाविष्ट केले आहे.

खारफूटीच्या

सोनोरिटा अल्बा (Sonneratia alba),ॲविसिनिया मरीना(Avicenia marina),ॲविसिनिया ऑफीसिनिलीस (Avicenia officinalis),रायझोफोरा म्युक्रोनाटा (Rhizophora mucronata),सॅल्वाडोरा पार्सिका (Salvadora persica ), ब्रूगेरा सिलिंड्रीका (Bruguiera cylindrica)

इत्यादि महत्वाच्या प्रजाती आहेत.ह्या प्रजातींची लागवड कौशल्याने व काळजीपूर्वक भरती/ ओहोटी पाहून पार पाडावी लागते.

वनविकास महामंडळाच्या ठाणे प्रकल्प विभागामार्फत टर्न की अंतर्गत खारफूटी लागवड कार्यक्रम हाती घेण्यात आला.त्या भागात आढळ असलेल्या ॲविसिनिया मरीना ह्या प्रमुख प्रजातींची रोपवने सन १९९६ ते २०१० या कालावधीत घेण्यात आलीत.

ही सर्व रोपवने यशस्वी ठरली असून वन विकास महामंडळ खारफूटी रोपवनासाठी अग्रेसर ठरले आहे. २०१० साली जागतिक बँकेच्या प्रतिनिधींनी घोडबंदर येथील खारफूटी रोपनानांना भेट देऊन समाधान व्यक्त केले होते.

केवळ खाजगी वितरणासाठी

**प्रकाशक-सेवक संघ, महाराष्ट्र, पुणे**

**संपादन - एस. के. गवळी**